“३५० वा शिवराज्याभिषेक” निमित्त शासकीय कार्यक्रम व शासकीय पत्रव्यवहारावर बोधचिन्ह वापरण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२१/प्र.क्र. ४५९/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २४ जुलै, २०२३

प्रस्तावना :-

“३५० वा शिवराज्याभिषेक” निमित्त शिवकालीन मंगल चिन्हे आणि महाराजांचा पराक्रम, शौर्य अधोरेखित करणाऱ्या विशेष बोधचिन्हाचे लोकार्पण करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा जागर पुन्हा मराठी मनांमनात व्हावा, जगभरात जेथे जेथे मराठी माणूस आहे तेथे तेथे या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार तसेच त्यांच्याबद्दलची माहिती पोहोचावी, हा या मागील उद्देश आहे. त्यानुषंगाने, राज्य सरकारच्या माध्यमातून वर्षभर आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांच्या प्रचार/प्रसिध्दीत तसेच शासकीय पत्रव्यवहारात सदर बोधचिन्हाचा (Logo) वापर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

“३५० वा शिवराज्याभिषेक” निमित्त शिवकालीन मंगल चिन्हे आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम, शौर्य अधोरेखित करणाऱ्या परिशिष्ट - “अ” मध्ये सुनिश्चित केलेल्या विशेष बोधचिन्हाचा (Logo) शासनाच्या सर्व शासकीय कार्यक्रमाच्या प्रचार/प्रसिध्दीत तसेच शासकीय पत्रव्यवहारांत कटाक्षाने वापर करण्यात यावा. तसेच, सर्व शासकीय कार्यालयांमध्ये दर्शनी भागात सदर बोधचिन्ह चित्रित करण्यात यावे. सदर बाब सर्व मंत्रालयीन/प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याच्या दृष्टीने योग्य त्या सूचना प्रसारीत कराव्यात.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०७२४१७३५५५७९२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VILAS RAMRAO THORAT

Digitally signed by VILAS RAMRAO THORAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT, 2.5.4.20=e6cc4d20348a52de465c7c34a61591bbe69b747ae11457103a0cfb9a57fc6ce6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=CB03C92B399CC89310BF1378C184D97A4B7B9B98E926EA8E71DD7BC9CB273631, cn=VILAS RAMRAO THORAT
Date: 2023.07.25 18:24:23 +05'30'

(विलास रा. थोरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. सभापती, विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधान मंडळ, मुंबई
३. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान मंडळ, मुंबई

४. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
५. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
६. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
७. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
८. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधान सभा यांचे खाजगी सचिव
९. राज्यातील सर्व सन्माननीय संसद व विधान मंडळ सदस्य
१०. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, यांचे स्वीय सहाय्यक
१२. सर्व अपर मुख्य सचिव / मा. प्रधान सचिव / मा. सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१३. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१४. सर्व विभागीय आयुक्त / सर्व जिल्हाधिकारी /मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद / आयुक्त, महानगर पालिका / मुख्याधिकारी, नगर पालिका
१५. सर्व क्षेत्रीय कार्यालये (मंत्रालयीन प्रशासकीय विभागामार्फत)
१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
१७. उप सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१८. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई ४०० ०३२
१९. अवर सचिव, अर्थसंकल्प शाखा, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
२०. निवड नस्ती, सां.का.४.

शासन निर्णय क्र. संकीर्ण-८२२३/ प्र.क्र.४५९/सां.का.४, दिनांक २४ जुलै, २०२३ सोबतचे

"परिशिष्ट - अ"

